**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1556/2007.**

श्री रामसागर पुंडलीक पिलेवान
83, हिंदुस्थान कॉलनी, वर्धा रोड,
नागपूर 440 015 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डि. एस. चिलमुलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त/प्रादेशिक संचालक (नगर प्रशासन)
नागपूर
2) श्री एस. एन. चौधरी
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार नगर परिषद प्रशासन नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.7.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.4.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.1.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा प्रादेशिक संचालक नगर परिषद प्रशासन यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मौजा पवनी जिल्हा भंडारा येथील न.भू.क्र. 2382 क्षेत्र 285.1 चौ.मि.पैकी शिल्लक असलेला वडिलोपार्जित जागेवरील बांधकामाची गैरअर्जदारांनी घरफोडी करुन व त्यावर केलेले अवैध बांधकाम पाडून टाकल्याबाबद नुकसान भरपाई व जमिनीचा ताबा मिळवून देण्याबाबद.

1) मा. श्री आर. व्ही. तलांजे साहेब अप्पर आयुक्त नागपूर यांचे स्वाक्षरीचे कार्यालयीन पत्र क्र. एमयुएन 19(2)/सिआर 06 आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नगर परिषद प्रशासन नागपूर दि. 31.1.06 अन्वये जिल्हाधिकारी भंडारा हयांना अग्रेषित. मा. जिल्हाधिकारी भंडारा हयांनी केलेल्या कार्यवाहीची प्रत पूरविण्याबाबद.

2) मा. बनगीनवार साहेब आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नगर परिषद प्रशासन नागपूर हयांचे कार्यालयीन पत्र क्र. एमयुएन 19(2)/सिआर 36/2006 दि. 22.8.2006 मुख्याधिकारी नगर परिषद पवनी यांना अग्रेषित. सदर तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची सांक्षांकित सत्यप्रत पुरविण्याबाबद. सदरची माहिती नोंदणीकृत डाकेने घेणार असे नमूद केले आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या प्रमाणे दि. 22.1.2007 रोजी मागितलेल्या माहितीची कागदपत्रे पृष्ठ क्र. 1 ते 10 उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु सदरच्या कागदपत्राच्या मधील निर्णयाच्या संदर्भात अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 3.3.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 29.3.2007 रोजी देण्यात आला असून मुख्याधिकारी व उपविभागीय अधिकारी भंडारा यांना खोटी माहिती पुरवून फसवणूक केलेली आहे अशाविरुध्द फौजदारी कार्यवाही करण्यात यावी व नुकसान भरपाई व जागेचा ताबा मिळवून देण्यात यावा असा युक्तीवाद केल्यामुळे व त्यासंबंधात माहिती अधिकार

अधिनियम 2005 मध्ये कार्यवाही करण्याची तरतुद नसल्यामुळे तसेच अपीलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली असलयामुळे व पुरविण्यात आलेल्या माहिती संबंधात काही आक्षेप किंवा चुका असल्यास त्या करिता सक्षम प्राधिकरणाकडे वेगळी तक्रार करावी लागेल या कारणास्तव अपीलार्थीचा प्रथम अपील अर्ज खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलाची कारणे पुन्हा अपीलकर्ता अर्जदारास कोर्टात न्याय मिळण्याबाबत आसुरी सल्ला दिल्याबद्यल व आपली जबाबदारी झटकल्याबद्यल अपील अधिकारी नगर परिषद प्रशासन नागपूर हयांच्याकडे दि. 28.3. 2007 सुनावणीस हजर राहुन सुध्दा उपरोक्त तक्रारीवर त्यांनी घेतलेल्या निर्णयाची माहिती न मिळण्याबाबद तसेच मुख्याधिकारी नगर परिषद पवनी हयांच्याकडे वेळोवेळी तक्रार अर्ज करुन सुध्दा दस्तऐवजाची पुष्टी न करता व मोका चौकशी न करता जाणिवपूर्वक खोटया दस्तऐवजाच्या आधारे नगर परिषदेने मंजुरी दिल्यामुळे उपरोक्त अहवाल खोटा व दिशाभूल करणारा आहे तसेच दोषी अधिका–यावर कार्यवाही करुन व गैरअर्जदारावर फौजदारी गुन्हा दाखल करुन नगर परिषदेने नियमानुसार अवैध बांधकाम पाडून जागेचा ताबा व नुकसान भरपाई अर्जदाराला मिळवून देण्याबाबत कार्यवाहीची सत्यप्रत पुरविण्याबाबत अशा प्रकारचे कारण दिलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचा दि. 6.1.2007 च्या अर्जातील वर नमुद केलेल्या माहितीची अवलोकन केले असता त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे हा प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निष्कर्ष योग्य आहे. परंतु प्रथम अपीलामध्ये तसेच द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता यांची विनंती ही अंतिम कारवाई करावी असे दिसून येते. तसेच अहवालामध्ये जी चौकशी केलेली आहे त्या चौकशीच्या संदर्भामध्ये सुध्दा गुणवत्तेच्या बाबत त्यांची तक्रार दिसून येते व त्यालाच ते चुकीचा व दिशाभूल करणारा अहवाल असे म्हणत आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणातील

कागदपत्राच्या, अभिलेख्याच्या, दस्तऐवजाच्या स्वरुपात जी माहिती अर्ज करतेवेळेस उपलब्ध असेल त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे एवढाच मर्यादित अधिकार आहे. कोणत्याही प्रकरणात निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये गुणवत्तेच्या बाबत निर्णय देणे किंवा आदेश करणे हे राज्य माहिती आयोगाच्या अधिकार कक्षेबाहेर आहे. त्याकरीता त्यांना स्वतंत्रपणे सक्षम अधिका–याकडे किंवा न्यायालयामध्ये उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे तक्रार करुन न्याय मिळवून घेता येईल व त्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जो निषकर्ष काढलेला आहे तो योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. माहिती उपलब्ध झाली तरी कारवाई करुन उपलब्ध झाली नाही किंवा अपीलकर्त्याच्या कल्पनेप्रमाणे केली नाही म्हणूनच द्वितीय अपीले सादर केली जातात असे दिसते.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 6.1.2007 च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे दि. 22.1.2007 रोजी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तसेच अपीलकर्ता यांच्या निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेच्या संदर्भातील कारवाईची विनंती मान्य करता येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 15.7.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.